महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
विस्तार इमारत, पहिला मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

Email: compcell.tdd-mh@mah.gov.in

दुरध्वनी क्र.०२२-२२०४७१४४

---

क्रमांक: निर्लेखन ०६२२/प्र.क्र.१८/सं.क.

दिनांक :- ०८/१२/२०२२

## आमंत्रण पत्र

**विषय** :- विभागातील निर्लेखित करण्यात आलेल्या आयटी उपकरणांची विल्हेवाट लावण्याबाबत..

**संदर्भ**:-१) शासन निर्णय साप्रवि क्र. मातंस/नस्ती०७/प्र.क्र.८९/३९ दि.०१/०८/२०११

२) शासन ज्ञापन आ.वि.वि.क्र. निर्लेखन -०६२२/ प्र.क्र. १८ / संगणक कक्ष, दि.१२.०९.२०२२.

विषयांकित प्रकरणी, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती ०७/ प्र.क्र.८९/३९, दि.०१.०८.२०११ नुसार, आदिवासी विकास विभागातील आयटी उपकरणांची संदर्भिय क्र.२ येथील ज्ञापनान्वये निर्लेखित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णयाप्रमाणे विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करून उर्वरीत खालील आयटी उपकरणांची विल्हेवाट लावण्यासाठी इच्छुक निविदाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | ऑल इन वन संगणक | १६ |
| २ | प्रिंटर | २२ |
| ३ | स्कॅनर | ०५ |
| ४ | सी.पी.यु. | ०६ |
| ५ | मॉनिटर | ०७ |
| | **एकुण** | ५६ |

इच्छुक निविदाधारकांनी आपले दर प्रती नग याप्रमाणे या कार्यालयास सिलबंद लिफाफ्यात **दि. १६/१२/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यत कक्ष अधिकारी (संगणक कक्ष), आदिवासी विकास विभाग, रुम नं १३३, मंत्रालय विस्तार इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२** या पत्त्यावर पाठवावे अथवा स्वत: आणून देण्यात यावेत. वरील साहित्य जसे आहे त्या स्थितीत आपणास उपलब्ध करुन देण्यात येतील, याची नोंद घ्यावी. तसेच दरपत्रकासोबत संबंधितांनी (व्यक्ती किंवा संस्था) यांचे नावे असलेले पॅन कार्ड सादर करणे अनिवार्य आहे.

प्राप्त दरपत्रके दि. १६/१२/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजता उपसचिव (संगणक कक्ष), आदिवासी विकास विभाग, रुम नं १३१, मंत्रालय विस्तार इमारत, पहिला मजला हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ येथे उघडण्यात येतील.

सावंत

(ल. प्र. सावंत)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन